# तोरण

जैविक विविधता विशेषांक

अंक ९६-९७, जुलै २०१४ ते मार्च २०१५

## अनुक्रमणिका

- संपादकीय
- धनगर मुलांची फिरत्या विज्ञान प्रदर्शनाला भेट
- जळो पण पिको
- तुम्हाला हे माहित आहे का?
- मिरढेवस्ती : बदलते चित्र
- अंतरातील घडामोडी
- जगातील आणि भारतातील काही स्थलांतरित जमाती
- मालधारी जमातीविषयी काही माहिती

देणगी मूल्य : रु. ५/-

## संपादकीय

### स्थलांतरित विरुद्ध स्थायिक जमाती

सजीव प्राणी म्हणून आपले स्थलांतर करणे व एकाच जागी वस्ती करून राहणे हे चक्र चालूच राहते. आपल्यातील कित्येकजण वाडवडीलांच्या मूळ गावापासून दूर जाऊन नवीन जागेत स्थायिक झाले आहेत. कदाचित आपली मुलेही आपण राहतो आहोत त्या ठिकाणापासून दुसरीकडे च स्थायिक होऊ शकतील. स्थलांतर आणि फिरस्ती ही मुळातच नकारात्मक किंवा वाईट गोष्ट नसते.

जर ह्या कल्पनेपासून आपण सुरुवात केली तर सेवा सुद्धा फिरत्या असू शकतील ही गोष्ट आपण चांगल्या अर्थाने समजू शकू. आपल्याकडे फिरते विक्रेते आहेतच.... ज्यायोगे आपण बाजारात जाण्याऐवजी मालच आपल्याकडे येतो, फिरते शिक्षण उदा: साखर शाळा...... फिरत्या विज्ञान प्रद्शनाला भेट दिल्याचा आमचा अनुभव..... फिरती आरोग्यसेवा...........

काही अपरिहार्य कारणांमुळे मधल्या काळात काही अंक निघू शकले नाहीत. याबद्दल दिलगीर आहोत

ह्या सर्व फिरत्या सेवा देताना ग्राहक एकाच जागी राहणारे आहेत हे गृहीत धरलेले आहे. परंतु स्थलांतरित व फिरणाऱ्या लोकांना केंद्र समजून जर अशाच फिरत्या सेवा त्यांना उपलब्ध करून देता आल्या तर त्यांचे जगणे थोडे सोपे होऊ शकेल. याकरता जास्त प्रयत्न केले तर?

अंतराच्या सध्याचा प्रकल्पात आम्ही स्थलांतरित गटांच्या समस्यांचा वेगळ्या पद्धतीने अभ्यास करतो आहोत. आमच्या या प्रवासात तुम्हीही आमच्याबरोबर यावे याकरता आम्ही तुम्हाला आमंत्रित करतो आहोत.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा, पुणे.

## धनगर मुलांची फिरत्या विज्ञान प्रदर्शनाला भेट

स्थलांतर करणाऱ्या धनगर कुटुंबातील मुलांचे शिक्षण ह्या संबंधीच्या आमच्या कामाचा भाग म्हणून धनगर समाजातील दहा मुलं व काही पालक ह्यांच्या बरोबर आम्ही एक उपक्रम आयोजित केला होता. आम्ही ह्या सर्वांना नाशिक रोड स्टेशनला एक विज्ञान विषयावरचे ओखे फिरते प्रदर्शन – 'सायन्स एस्प्रेस बायोडायवर्सिटी स्पेशल'– दाखवण्याकरता बरोबर घेऊन गेलो. एका सोळा डब्यांच्या वातानुकुलित आगगाडीतून शाळेतल्या मुलांपर्यंत पोचता यावे म्हणून हे प्रदर्शन भारतभर फिरत होते. हा उपक्रम दर काही वर्षांनी विषय बदलून गेली सहा वर्षे सतत चालू आहे. २०१२ पासून प्रदर्शनाचा विषय आहे जैवविविधता. प्रत्येक डब्यात भारतातल्या प्रत्येक प्रदेशातली जैवविविधता दाखवली आहे. २०१२ मध्ये अंतराने दक्खन पठारावरील स्थानिक गृहसंवर्धित जैवविविधता विभागासाठी माहिती देण्यामध्ये सहभाग घेतला होता. ह्यामध्ये खास करून धनगरांकडे असणारी प्रसिद्ध 'दक्खनी मेंढी' व ह्या मेंढ्यांची चराऊ कुरणे ह्यांचा समावेश होता. म्हणूनच धनगर समाजातील मुलांनी ही आगगाडी पहाणे हे त्यांच्या दृष्टीने योग्य होईल असे अंतराला मनापासून वाटले. जन्मापासून जैवविविधतेच्या सानिध्यात वाढलेल्या ह्या मुलांनी नवीन नेरेतून अनेक वनस्पती व जूवरे ह्यांच्याकडे बघण्याचा पुरेपूर आनंद लुटला. प्रदर्शनातल्या एका हरणाच्या प्रतिकृतीकडे बोट दाखवून एक मुलगा म्हणाला अरे, ही हरणं तर आम्ही रोज पाहतो. अनेक वर्षांपासून अंतराबरोबर जोडलेले एक धनगर महेंद्र खींळ यांनी असे सुचवले की लांडग्यांची असाखळी दाखवणाऱ्या प्रतिकृतीमध्ये मेंढीच्या चित्राचा समावेश करावा. 'इंधन वाचवा' विभागामधून जात असताना काही धनगर असे म्हणाले, आम्ही तर हे करतोच. आम्ही क्वचितच जीवाश्म इंधन वापरतो. जशी मुले हे आगगाडीतले प्रदर्शन बघून खूप काही शिकली असतील तसेच आम्हालाही धनगरांकडून खूप काही शिकता आले.

केतकी व अपूर्वा
अंतरा संस्था पुणे

❖❖

## जळो पण पिको

एकदा शिव–पार्वती डोंगरातून फिरत होते. चालता चालता पार्वतीच्या साडीत कुसळ घुसले. तिला खूप राग आला. ती शिवाला म्हणाली, ही सगळी कुसळे नष्ट करून टाका. यावर शिवाने विचारले, हे सर्व गवत जर आपण पूर्णपणे नाहीसे केले तर आपली जनावरे काय करतील? ती काय खातील? जरी आपण कुसळ जाळले तरी ते परत उगवते म्हणून आपण ते जाळून टाकूया. ते परत उगवेल. तेव्हापासून शेतीमध्ये राब करण्याच्या प्रथेची सुरुवात झाली.

बळीराम किसन
पसरणी

❖❖

## तुम्हाला हे माहित आहे का?

### १) फाशी/काळपुळी

जर तुमची मेंढी अचानक दगावली व नाकातून, तोंडातून व संडासमार्गे रक्तस्त्राव होत असला तर तो फाशी/काळपुळी रोग असण्याची शक्यता आहे. हा अतिशय घातकी आजार आहे व माणसांना सुद्धा त्याचा संसर्ग होऊ शकतो.

**आपण काय करू शकतो?**

- दक्षावलेले जनावर पुरताना भरपूर मीठ टाकण्याची काळजी घ्यावी किंवा शक्य असेल तर जनावराला जाळावे.
- गरज नसताना जनावर हाताळू नये विशेषतः हाताला जखम झाली असेल किंवा कापले असेल तर
- जनावराला हलवू नका व शव विचेद्र करू नका
- जनावरांची चरण्याची जागा बदला
- दगावलेल्या जनावराचे मांस खाणे टाळावे
- लवकरात लवकर पशुसंवर्धन विभागाशी किंवा जवळच्या सरकारी पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधा

### २) ब्रुसेलॉसेस

कळपातल्या बऱ्याच जनावरांचा गर्भपात झाला तर तो ब्रुसेलॉसेसचा आजार असू शकेल. हा माणसांना संसर्ग करणारा आणखी एक आजार आहे.

अशा जनावरांचे दूध न उकळता प्यायल्यास माणसांना घातक ठरू शकेल

**आपण काय करू शकतो?**

लवकरात लवकर जवळच्या सरकारी पशु वैद्यकीय डॉक्टरशी संपर्क साधावा

३) पी पी आर
जर तुमच्या मेंढ्यांनी घाण वास येणारा जुलाब, खूप ताप, लंगडणे व तोंडाभोवती फोड अशी लक्षणे दाखवली तर तो पी पी आर चा आजार असू शकेल

**आपण काय करू शकतो?**
लवकरात लवकर जवळच्या पशु वैद्यकीय डॉक्टरशी संपर्क साधावा

❖❖

# मिरढेवस्ती : बदलते चित्र

प्रामुख्याने धनगर समाज अधिक प्रमाणात असलेले 'मीरढे' हे एक फलटण तालुका, जिल्हा सातारा इुले लहानसे खेडेगाव (वस्ती) आहे. याच समाजातील सखाराम लकडे यांनी सॉनथायमर या धनगर समाजाचा अभ्यास करणाऱ्या समाज शास्त्रज्ञाला त्यांच्या कामात अनेक वर्षे साथ दिली. त्यामुळे मिरढे हे सखाराम लकडे यांचे गाव म्हणूनही सर्वांना परिचित आहे. मेंढीपालन हा धनगर समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. ह्या मेंढपाळांकडे ५० ते २००–२५० मेंढ्यांची संख्या असायची. के लोक आठ महिने मेंढ्यांचा कळप घेऊन संपूर्ण कुटुंबाबरोबर बीड, कोकण इ. ठिकाणी चाऱ्याच्या शोधात स्थलांतर करत असत. पावसाळ्याचे चार महिने ते स्वतःच्या गावी राहत असत.

मेंढीपालन हा त्यांचा परंपरागत व्यवसाय. मेंढीपासून त्यांना दूध, मटण, लोकर, कातडी पासून उत्पन्न मिळायचे. त्यांचा संपूर्ण उदरनिर्वाह मेंढी पालानावरच असायचा. परंतू मागील पाच–सहा वर्षात, इथल्या बऱ्याच मेंढपाळांनी त्यांच्या मेंढ्या विकून टाकल्या आहेत व २००५ मध्ये ट्रॅक्टर खरेदी केले आहेत. ट्रॅक्टर खरेदी करून, शेतीची मशागत करणे, जमीन लेव्हलिंग करणे अशा प्रकारचा बीड व इतर भागात नवीन व्यवसाय सुरु केला आहे. ह्या बातमीला वर्तमान पत्रातही चांगली प्रसिद्धी मिळाली होती.

मिरढेवस्तीतल्या एकूण १५ धनगर कुटुंबांपैकी १४ कुटुंबांनी त्यांचे संपूर्ण मेंढ्यांचे कळप विकले आहेत. फक्त एका कुटुंबाकडे सध्या ५० ते ६० मेंढ्या आहेत.

ह्या वस्तीवरील मेंढपाळांची मेंढ्या विकण्याची बरीच करणे आहेत –

सर्वात महत्त्वाचे म्हणजे मेंढपाळांना, विशेषतः नवीन पिढीला हा व्यवसाय खूपच कठीण व त्रासाचा वाटतो. आधुनिक जीवनशैलीचा स्थलांतरीत जीवनपद्धतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन कमीपणाचा आहे. पाणी ही मोठी अडचण भासते. जनावरे व माणसे ह्यांना वैद्यकीय उपचार वेळेवर मिळेल ह्याची शाश्वती नसते. चाऱ्याच्या समस्येमुळे वर्षातून आठ महिने दूरवर भटकावे लागते. स्थलांतर मार्गात व स्थलांतर ठिकाणी त्यांना खूपच अडचणी येत असत. उदा: चोरी, वाटमारी, स्थानिक शेतकऱ्यांचे मेंढी चारण्यावरून भांडणे–तंटे. संपूर्ण कुटुंब बरोबर घेऊन स्थलांतर करत असल्यामुळे त्यांच्या महिलांना रानावनात राहणे, ऊन, थंडी, वारा, पाऊस, गारपीट अशा संकटांना सामोरे जावे लागायचे. स्थलांतरामुळे त्यांच्या मुलामुलींचे शिक्षण होतच नव्हते. स्थलांतर ठिकाणी सुद्धा मुलांना शाळेत पाठवणे अशक्य होत असे.

मेंढ्या विकून ह्या मेंढपाळांनी आत ट्रॅक्टरचा व्यवसाय सुरु केला आहे. त्या करता केवळ पुरुषमंडळी बाहेरगावी जात आहेत. महिला व वृध्द व्यक्ती मूळगावीच राहतात. त्यामुळे मुलामुलींना शाळेत जाणे शक्य झाले आहे.

ट्रॅक्टर व्यवसायात कमी कष्टात जास्त पैसा मिळतो परंतू हा व्यवसाय चार–पाच महिने ठराविक मोसमातच चालतो. मेंढपाळांच्या मते उरलेले सहा–सात महिने ट्रॅक्टर व्यवसाय हवा तेवढा फायदेशीर चालत नाही.

ट्रॅक्टर खरेदीमुळे मेंढपाळांनी व्यावसाया–बरोबरच त्यांची स्वत:ची जमीन लागवडी योग्य करून घेतली. ज्यांच्याकडे स्वतःची जमीन आहे ती कोरड वाहू व माळरानाची आहे. त्यांनी स्वतःचे ट्रॅक्टर खरेदी केल्यामुळे त्यांची जमीन योग्य प्रकारे लेव्हलिंग करून, संपूर्ण जमिनीची योग्य प्रकारे मशागत करून घेतली. प्रत्येकानी त्यांच्या शेतीत बोअरवेल, विहिरी अशी पाण्याची सोय करून घेतली. सध्या ते डाळींब व इतर नगदी पिके घेत आहेत. स्वतःचा ट्रॅक्टर असल्यामुळे शेतीमध्ये एवढी सुधारणा शक्य झाली.

मेंढ्या विकल्यामुळे महिलांना व वयस्कर मंडळींना काय वाटते हेही जाणून घ्यायला हवे.

पहिल्यांदा मेंढपाळांनी मेंढ्या विकल्या तेव्हा महिलांचे कशातच मन लागत नव्हते. त्या म्हणतात की रात्री अपरात्री त्यांना मेंढ्यांची स्वप्ने पडायची. आपल्या घरी खूप मोठे हानी झाली, चोरी झाली की काय असे वाटायचे.

मेंढ्या होत्या तेव्हा त्यांना हवे तेव्हा ताजे दूध, मटणई. मिळत असे. आता त्यांना हे सर्व खरेदी करावे लागते. मेंढ्या म्हणजे त्यांच्या करता लक्ष्मी आहे. आपल्या तरूण मुलांनी किमान पाच–दहा मेंढ्या तरी ठेवाव्यातच म्हणून वयस्कर मंडळी आग्रह धरीत आहेत.

मेंढपाळांबरोबर मेंढीपालन व्यवसाया–संबंधी संवाद साधला असताना ते म्हणाले की मेंढीपालन जरी कष्टाचे असले तरी तो व्यवसाय समाधान देतो. विहिरीत जसे झरे असतात ज्यामुळे विहिरीत सतत थोड्या फार प्रमाणात पाणी शिल्लक राहते तशीच परिस्थिती मेंढीपालन व्यवसायाची आहे. मेंढीपालन व्यवसाय म्हणजे एक प्रकारचा उत्पन्नाचा वाहता झराच आहे – दूध, मटण, कातडी, लोकरई. मुळे उत्पन्नात भर पडत राहते. शिवाय मेंढीमुळे शेती करता लेंडीखतही मिळते.

ह्यापुढे तरुण पिढी मेंढीपालन करून स्थलांतरासाठी नक्कीच जाणार नाही असे वयस्कर मंडळींचे मत आहे. केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी मेंढीचे दूध, मटण व थोडेफार लेंडीखत मिळेल व स्वतःच्या शेतीतील चारा पुरेल ह्यासाठी ते मेंढीपालन करणार आहेत. सध्या प्रत्येक मिरढेवस्तीवरील धनगर समाजातील व्यक्तीकडे म्हैस, संकरीत गाय व बागायती शेती हा व्यवसाय चालू आहे. तसेच प्रत्येकाने दहा–बारागावरान कोंबड्या पाळलेल्या आहेत.

तुम्हाला याबद्दल काय वाटते? स्थलांतरित पशुपालन टिकून रहावे याकरता काय करता येईल?

दिलीप हालसे

❖❖

## अंतरातील घडामोडी

१ मार्च २०१४ – महिला दिनानिमित्त‘ इंडियन व्हेटेरीनेरी अन असोसीएशन’ च्या केरळा चॅपटरने आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. नित्या घोटगे यांचा सहभाग

१४ एप्रिल २०१४ – इंटीग्रेटेड डेरी प्रोडक्शन अँड युस ऑफ मेडिसीनल प्लांट्स, सॉईल्स, ॲनीम्ल्स अँड पीपल या विषयावर आयोजित परिषदेत डॉ. नित्या घोटगे यांचा सहभाग

२१ ऑक्टोबर २०१४ – डॉ. नित्याघोटगे यांची भारतातील औषधी वनस्पतींची माहिती देण्याकरता नेदरलँडसला भेट

३० ऑक्टोबर २०१४ – बी बी सी लंडनने अंतराच्या सहभागाने तयार केलेल्या‘ मॉन्सून’ ह्या व्हिडीओचे प्रकाशन

२१ नोव्हेंबर २०१४ – युरोपीयन संघ मुक्त व्यापार करार या विषयावर दूध उत्पादकांबरोबर पुण्यातील प्राईड हॉटेल येथे मिटींग

२२ नोव्हेंबर२०१४ – सर्वांकरता अन्न (Food for all) या विषयावर थॉटवर्क्स पुणे या संस्थेनी आयोजित केलेल्या मिटींगमध्ये अंतराचा सहभाग

२४ डीसेंबर २०१४ – धनगर समाजातील मुले व पालक यांच्याकरता जैवविविधतेशी संबंधित आगगाडीतले फिरते विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी नाशिकला एक दिवसीय सहल

१४ जानेवारी २०१५ – हवामान बदल, दुष्काळ व पशुपालक समाज या विषयावर इंडियन इंटरनॅशनल सेंटर, नवी दिल्ली इथे आयोजित केलेल्या परिषदेत डॉ. नित्या घोटगे यांचा सहभाग

२० जानेवारी २०१५ – टाटा सामाजिक विज्ञानसंस्था, तुळजापूर येथील विद्यार्थ्यांची अंतरा संस्थेला भेट

३ मार्च २०१५ – बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मुंबईने आयोजित केलेल्या‘ दक्खन पठारावरील वन्यजीव संवर्धन’ या विषयावरच्या दोन दिवसाच्या कार्यशाळेत अंतरातर्फे अपूर्वाचा सहभाग

१ एप्रिल२०१५ – अंतरा हैद्राबाद संस्थेचा सहभाग संपुष्टात

❖❖



## जगातील आणि भारतातील काही स्थलांतरित जमाती

| जमातीचे नाव | देश / प्रदेश | जनावरांचा प्रकार | जनावरांची जाती |
|---|---|---|---|
| सामी | फिनलंड (युरोप) | रेनडीअर | सामी |
| मसाई | केनिया (आफ्रीका) | गाय, बैल, मेंढी | रेड मसाई मेंढी |
| बोराना ओरोमो | इथिओपिया (आफ्रीका) | गाय | बोरान |
| फुलानी | कॅमेरून (आफ्रीका) | गाय, बैल | व्हाईट फुलानी आणि रेड फुलानी |
| वन गुज्जर | उत्तराखंड | म्हैस | तराई |
| बकरवाल | काश्मीर | शेळी, मेंढी | बकरवाल |
| गद्दी | हिमाचल | मेंढी | गद्दी |
| तोडा | तामिळनाडू | म्हैस | तोडा |

## मालधारी जमातीविषयी काही माहिती

आपल्या आजूबाजूला आपण रंगीबेरंगी पोषाख केलेली माणसे – रंगीत पागोटे, रंगीत कपडे, वेगवेगळे दागिने, त्यांच्या गिर जातीच्या गायीरोबर सतत स्थलांतर करताना पाहत असतो. परंतु ही कोणत्या जमातीची लोक असतील असा सहसा विचार आपण करत नाही. ही पशुपालक जमात ‘मालधारी’ म्हणून ओळखली जाते.

वंशपरंपरागत पशुपालन करणे व विशेष म्हणजे गिर जातीच्या गायींचे पालन करणे म्हणजेच भगवान श्रीकृष्णांनी दिलेले वरदान होय असा भाव मनात ठेवून तसेच शाकाहारी जीवन जगणारे, कसलीच नशापाणी न करणारे व या गो–पालनात तोटा झाला तरी खचून न जाणारे व येणाऱ्या अडचणींना उत्साहाने सामोरे जाणारे गो–पालक म्हणजेच मालाधारी समाज होय.

१९७२ च्या भीषण दुष्काळानंतर मालधारी गुजरातमधून महाराष्ट्रात आले. त्यांची नोंद कुठल्याच गावच्या कागदपत्रात नसते किंवा जनगणनेत त्यांचा उल्लेख येत नाही. भारताच्या अर्थव्यवस्थेत त्यांच्या असलेल्या खारीच्या वाट्याचा उल्लेखही नसतो. दुष्काळाच्या कालावधीत त्यांची स्वतःची किंवा त्यांच्या जनावरांची जीवितहानी होऊ नये याकरता, मालाधारी सरकारकडे कोणत्याही प्रकारची मदत मागत नाहीत. परंतु कोरडवाहू प्रदेशात उपलब्ध असलेल्या संसाधनांचा उत्पादन क्षमता टिकवण्याकरता जास्तीजास्त कसा उपयोग करता येईल याचा विचार करतात.

शेणखत एकत्र साठवेले तर स्थानिक शेतकरी त्यांच्या शेतीकरता ते विकत घेतात ही माहिती मालधारी जमातीला मिळाली. म्हणून एकाच जागी स्थायिक राहायचे ठिकाण मिळते का याचा विचार त्यांच्या मनात आला. म्हणून त्यांनी साखर कारखाने असलेली ठिकाणे निवडले. ‘मुघलवाडी’ तालुका पैठण येथिल साखर कारखान्यात १७–१८ वर्षांपासून ते स्थायिक आहेत.

ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखाने आणि मालधारी यांचे संबंध जिल्ह्यजिल्ह्यांनुसार वेगवेगळे असतात. काही ठिकाणी ते ऊस विकत घेतात, काही ठिकाणी शेतकरी शेणखत घेतात व ऊस देतात. काही ठिकाणी तर लोकांनी साखर कारखान्यांबरोबर कंत्राट केले आहे ज्यामुळे त्यांना ऊसाचे शेंडे व चारा मिळतो व त्या करता त्यांची माणसे काही तासाकरता कारखान्यात रोज काम करतात. अशाच तऱ्हेचा व्यवहार ते राहण्याच्या जागेकरता व पिण्याच्या पाण्याकरता करतात.

गायी आणि म्हशीपासून मिळणाऱ्या दुधाची विक्री ते वेगवेगळ्या मार्गाने करतात, उदा. प्रत्यक्ष ग्राहक, डेरी, हॉटेल व मिठाईची दुकाने. गिर गायीचे दूध बंगाली मिठाई बनविण्याकरता फारच चांगले समजले जाते.

❖ ❖

**बुक-पोस्ट**

प्रति,


**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**